Kaizzen Communications
looking beyond

**Publication**: Sakal **Edition:** Mumbai **Date:** 27th November, 2016

# सट्टेबाजीतून मिळेल कोट्यवधींचा महसूल

## अधिकृत करण्याची मागणी; अखिल भारतीय गेमिंग फेडरेशनच्या चर्चासत्रातील सूर

**सकाळ वृत्तसेवा**

गंगटोक, ता. २६ : अनेक राज्यांत परवानगी नसतानाही कसिनो, गेमिंग, सट्टेबाजी सुरू आहे. देशभरात वर्षाला सुमारे ४० हजार कोटींचा सट्टा लावला जातो. सिक्कीम आणि गोव्यात हा प्रकार अधिकृत असल्याने या राज्यांना त्यातून कोट्यवधींचा महसूल मिळत आहे. इतर राज्यांनीही ते अधिकृत केल्यास त्यांनाही असाच महसूल मिळू शकेल, असा सूर अखिल भारतीय गेमिंग फेडरेशनतर्फे (एआयजीएफ) येथे झालेल्या चर्चासत्रातून पुढे आला.

देशात सुरू असलेले बेटिंग, कॅसिनो, ऑनलाईन गेमिंगमुळे समाजावर होणारे परिणाम व त्याद्वारे सरकारला मिळणारा महसूल या विषयावर नुकतेच एक चर्चासत्र पार पडले. 'एआयजीएफ'तर्फे घेण्यात आलेल्या या चर्चासत्रात अनेक मान्यवर व देशभरातील माध्यमांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. सिक्कीममध्ये सुरू असलेली ऑनलाईन लॉटरी, गेमिंग, कॅसिनो तसेच सट्टेबाजीसंदर्भात असलेले कायदे व त्याची रचना याचा ऊहापोह या वेळी करण्यात आला. एआयजीएफची स्थापना जून २०१६ मध्ये झाली. ही संस्था सट्टेबाजी आणि जुगार अधिकृत करण्यासाठी प्रयत्न करत आहे.



सिक्कीमसारख्या राज्यात डोंगराळ भागामुळे पुरेशा प्रमाणावर शेती करता येत नाही. उद्योगांसाठीही येथील भौगोलिक रचना पोषक नसल्याने त्याद्वारे राज्याला मिळणारे महसूल मर्यादित आहे. ऑनलाईन लॉटरी व सट्टेबाजीला येथे परवानगी दिल्याने सरकारला मोठा महसूल मिळत आहे. त्यामुळे या राज्याच्या विकासाला या उद्योगाचा मोठा हातभार लागत आहे. येथील हजारो तरुणांना त्यातून रोजगाही मिळाला. सिक्कीममध्ये यशस्वी झालेल्या या उद्योगाला इतर राज्यांनीही परवानगी दिल्यास महसूलवाढीसह देशात रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असे या वेळी वक्त्यांनी सांगितले.

२००९ मध्ये सिक्कीम राज्यात कसिनोला अधिकृत परवानगी मिळाली. राज्यात सध्या दोन कसिनो कार्यरत आहेत. तिसरा पुढील महिन्यात सुरू होत आहे. गोव्यातही कसिनोमुळे सरकारला १५० कोटींचा महसूल मिळत आहे. कसिनोमुळे राज्यातील पर्यटकांची संख्या चार ते पाच लाखांवरून १२ लाखांवर गेली आहे. ती वर्षाला ५० लाखांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. नोटाबंदीच्या निर्णयाचाही या उद्योगाला मोठा फटका बसत असला, तरी ते तत्कालिक असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

सीबीआयचे माजी संचालक रणजित सिन्हा यांनीही सरकारने सट्टेबाजी अधिकृत करावी, अशी मागणी केली. त्यासाठी ठोस नियम बनवणे आणि त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सिक्कीम आणि गोव्याने हे सिद्ध करून दाखवले आहे. त्यामुळे या राज्याचे अनुकरण इतर राज्यांनीही करावे, असे त्यांनी सांगितले.

इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सचे (फिक्की) प्रतिनिधी राजपाल सिंह यांनी सांगितले, की सध्या देशात बेकायदा सट्टेबाजी सुरू आहे. याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. त्याला अधिकृत करणेच योग्य ठरेल.

### स्थानिकांना मज्जाव

**स्थानिक तरुण या लॉटरीच्या आहारी जाऊ नये, यासाठी सिक्कीममध्ये कडक नियम आहेत. येथील कॅसिनोमध्ये स्थानिकांना परवानगी नाही. केवळ परदेशी नागरिक व देशातील इतर राज्यांतील नागरिकांनाच स्थानिक नसल्याचा पुरावा दाखवून येथे खेळण्यास परवानगी मिळते. त्यामुळे परदेशी पर्यटकांची येथे मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. त्यानिमित्ताने येथील पर्यटनालाही चालना मिळते. येथील ऑनलाईन लॉटरी केंद्रात एखाद्या व्यक्तीसंदर्भात पत्नी किंवा मुलाने अधिकृत तक्रार केल्यास त्याला लॉटरी केंद्रात येण्यास मज्जाव केला जातो.**

**<u>Legal gambling will help tax mobilisation</u>**